मंगळवार दि. ०२ जून २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २७१ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

[illegible] हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# तेच वाहन, पुन्हा गुटखा! मुख्य आरोपींपर्यंत पोलिसांचे हात कधी पोहोचणार?

## २५ लाखांचा गुटखा पकडला; पण मोठा मासा अजूनही जाळ्याबाहेर

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्याच्या अवैध साठा आणि वाहतुकीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत तब्बल २५ लाख ८४ हजार ४२ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. कल्पतरू पार्क परिसरात उभ्या असलेल्या दोन वाहनांमधून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि जर्दा आढळून आल्याने गुटखा माफियांच्या हालचालींवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे



पोलीस निरीक्षक पंकज जाधव आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली. गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार कल्पतरू पार्क, जालना येथील एका इमारतीसमोर संशयास्पदरीत्या उभ्या असलेल्या दोन वाहनांची तपासणी करण्यात आली.

तपासणीदरम्यान महिंद्रा बोलेरो पिकअप (-२१--८१९९) आणि एका ॲपे लोडिंग रिक्षामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला राजनिवास, रजनीगंधा, सिग्नेचर पानमसाला व जाफरानी जर्दा असा मोठा साठा आढळून आला. या साठ्याची किंमत १४ लाख ८४ हजार ४२ रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. तसेच दोन्ही वाहनांची अंदाजे किंमत ११ लाख रुपये असून एकूण २५ लाख ८४ हजार ४२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. बेवारस वाहनांमुळे मालकांचा शोध सुरू दोन्ही वाहने घटनास्थळी बेवारस अवस्थेत आढळून आल्याने वाहन चालक व मालकांविरुद्ध कदीम जालना पोलीस *(पान २ वर)*

### तपासातील महत्त्वाचे प्रश्न

जप्त करण्यात आलेला प्रतिबंधित गुटखा नेमका कुणाचा?
बेवारस अवस्थेत वाहने सोडून चालक फरार कसे झाले?
-२१--८१९९ या वाहनाचा पूर्वीच्या गुटखा प्रकरणाशी काय संबंध?
गुटखा तस्करीच्या साखळीतील मुख्य सूत्रधार कोण?
पूर्वी कारवाई झालेल्या संशयितांपर्यंत पोलिसांचे धागेदोरे पोहोचणार का?

# जालना मनपाच्या लाचखोर अधिकाऱ्यांना न्यायालयीन कोठडी

## ४० हजारांच्या लाच प्रकरणात दोन्ही आरोपींना १२ जूनपर्यंत कारावास; ए.सी.बी चा तपास सुरू

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेतील बहुचर्चित लाचखोरी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या दोन अधिकाऱ्यांना न्यायालयाने १२ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. नालेसफाई व अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईसाठी ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडलेल्या या अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून (ए.सी.बी) प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जालना महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागातील सॅमसन छबुराव कसबे (स्वच्छता निरीक्षक तथा सहायक अतिक्रमण पथक प्रमुख) आणि भाऊलाला चापा राठोड (प्रभारी सहायक अतिक्रमण पथक प्रमुख) या दोघांविरोधात सदरबाजार पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नालेसफाईसाठी मागितली लाच**

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, शहरातील मामा चौक ते कोलू तेली घाणा संघ परिसरातील नाल्यावर *(पान २ वर)*


## सद्भावना सेवा समितीच्यावतीने आयोजित

# श्री खाटुशामजी रेल्वे यात्रा व भागवत कथे मध्ये सर्वांनी सहभाग घ्यावा - राधेश्याम चांडक

**दत्ता देशमुख**

सद्भावना सेवा समिती द्वारा दि. ३० ऑगस्ट २०२६ ते दि. ०५ सप्टेंबर २०२६ पर्यंत श्री खाटुशामजी रेल्वे यात्रेचे आणि श्रीमद्भावगत कथेचे आयोजन केले आहे. कथा प्रवक्ता चित्रकुट येथील बालसंत श्री दिपशरणजी महाराज आहेत. शहरातील अनेक शाम भक्तांचा समितीकडे खाटुशाम रेल्वे यात्रा काढावी असा आग्रह केला होता.

म्हणुन खास लोकाग्रहास्तव रेल्वे यात्रेचे आयोजन समितीच्यावतीने केले आहे.मर्यादीत संख्या असल्याने जे प्रथम नोंदणी करतील त्यांना घेण्यात येईल व ना नफा ना तोटा या तत्वावर ७ दिवशीय रेल्वे यात्रेचे आयोजन केले आहे. असे आवाहन सद्भावना सेवा समितीचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांनी केले आहे. भागवत कथेचे मुख्य यजमान सौ. सरला सुरेशचंद्र गट्टाणी असुन या कथेमध्ये विविध प्रसंग व उत्सव साजरे केले जाणार आहेत. दि. ३१ ऑगस्ट २०२६ ला भागवत



कथा महात्म्य, राजा परिक्षीत व शुकदेव कथा, दि.०१ सप्टेंबर २०२६ रोजी शिव विवाह, धृव चरित्र, दि. ०२ सप्टेंबरला राम जन्म, कृष्ण जन्म दि. ०३ सप्टेंबर २०२६ ला रुख्मीनी स्वंयवर, गोवर्धन पुजा, दि. ०४ सप्टेंबर २०२६ ला सुदामा चरित्र, श्री खाटुशामजीच्या पावन भुमीवर भागवत कथेचे आयोजन अत्यंत महत्वाचे मानले जाते. भगवान श्रीकृष्णाचा अवतार खाटुशामला मानतात. अदभुत त्याग व मानवतेच्या कल्याणासाठी शिशदान अशी अदभुत कथा खाटुशामजीची आहे. कौरव-पांडवाच्या युध्दात जो हारेल त्यांच्याकडुन मी लढेल असे वचन आईला देवून त्याचे तंतोतंत पालन कलीयुगातही खाटुशामजी करीत आहेत. म्हणुन जे जिवनात हताशः होतात, प्रयत्न व परिश्रम करून यश पदरी पडत नाही, नैराश्य येते व हारतात असे भाविक भक्त खाटुशामजीला जातात कारण हारे का सहारा खाटुखाम हमारा असे सर्व भक्त खाटुशामजीला जाऊन आपले गाऱ्हाणे मांडतात व ते पुर्ण होते अशी श्रध्दा भाविकांमध्ये आहे.

अल्पशः खर्चात सर्व भाविकांनी चहा, नाश्ता, दोन वेळेचे भोजन, निवास व्यवस्था सद्भावना सेवा समितीद्वारा करण्यात येणार आहे. मलकापूर स्टेशनवरून दि. ३० ऑगस्ट २०२६ दुपारी ११.३० वाजता रेल्वे द्वारा निघायचे आहे. दोन महिने आधी रेल्वेचे आरक्षण करावयाचे असल्याने भाविकांनी ताबडतोब नोंदणी करावे असे आवाहन समितीने अध्यक्ष भाईज़ींनी केले. संपर्कासाठी चंपालाल शर्मा, प्रकाशचंद्र पाठक, राजेश देशलहरा, तिलोकचंद चांडक, सुरेशचंद्र गट्टाणी, सिध्दार्थ शर्मा, उमेश मुंधडा, विजय व्यवहारे, सुभाष दर्डा, मधुकर गायके, पुरणमल शर्मा, मनमोहन शर्मा, लालाभाई माधवाणी यांच्या मोबाईल नंबरवर संपर्क करावा. यात्रा यशस्वी होण्यासाठी ही सर्व मंडळी विशेष परिश्रम घेत आहेत. पुढील वर्षी समितीच्या वतीने बद्रीकेदार येथे अश्या प्रकारच्या रेल्वेच्या आयोजनाचे प्रयत्न केले जाणार आहे व कथा आयोजित केली जाणार आहे.

श्री खाटुशामजीच्या आसपास अनेक दर्शनिय स्थळे आहेत जसे शामकुंड, जीनमाता मंदिर, काजळ शिखर रोप वे ने, हर्षनाथ मंदिर, पुष्कर, सावित्रीमाता मंदिर रोप वे द्वारा, लोहगील तिर्थधाम, सालासर बालाजी, जयपुर इत्यादी सद्भावना सेवा समितीद्वारा आयोजित श्री खाटुशामजीच्या पावन भुमीवर श्रीमद्भावगत कथेचा आनंद घ्यावा व पाच दिवस निवास करून अध्यात्तमिक आनंद प्राप्त करावा असे भावपुर्ण आवाहन भाईजींनी केले.

# दोन महिन्यांपासून काम ठप्प नागरिक, प्रवासी हैराण, पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करावे

## टेंभूर्णी-डावरगाव देवी दहेगाव रस्त्याचे काम रखडले



**दत्ता देशमुख**

जाफराबाद तालुक्यातील टेंभूर्णी ते डावरगाव देवी या महत्त्वाच्या रस्त्याचे बांधकाम गेल्या दोन महिन्यांपासून ठप्प पडल्याने नागरिक,प्रवासी शेतकरी, विद्यार्थी आणि भाविकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. डावरगाव येथील प्रसिद्ध देवी मंदिराकडे जाणारा हा प्रमुख मार्ग अर्धवट अवस्थेत असल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पर्यटन स्थळांमध्ये असणारे या देवी मंदिरासाठी जाण्यासाठी रस्ता नाही, तसेच दहिगाव निमखेडा खापरखेडा आधी गावांना जोडणाऱ्या या रस्त्यांवरून जाणारी शेतकरी प्रवासी विद्यार्थी त्रस्त झालेली आहे.

या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाल्यानंतर काही अंतरावर काम करण्यात आले; मात्र त्यानंतर ठेकेदाराने काम अचानक बंद केल्याचे चित्र आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे, उघडी गिट्टी आणि मुरूमाचे ढिगारे असल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. डावरगाव देवी मंदिर हे परिसरातील श्रद्धास्थान असून दररोज शेकडो भाविक येथे दर्शनासाठी येतात. नवरात्रोत्सव, पौर्णिमा आणि इतर धार्मिक कार्यक्रमांच्या काळात हजारोंच्या संख्येने भाविकांची गर्दी होते. मात्र खराब रस्त्यामुळे मंदिराकडे जाणे अत्यंत धोकादायक बनले आहे. स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे काम रखडले असून संबंधित विभाग आणि लोकप्रतिनिधीही याकडे दुर्लक्ष करत आहेत. अनेकदा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, असा आरोप नागरिकांनी केला आहे. दरम्यान, पावसाळा तोंडावर आल्याने परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे.

रस्ता चिखलमय झाल्यास भाविक, विद्यार्थी, शेतकरी तसेच रुग्णवाहिकांनाही अडचणींचा सामना करावा लागू शकतो. *(पान २ वर)*

### रखडलेले काम लवकर सुरू करावे

टेंभूर्णी-डावरगाव देवी दहेगाव रस्त्याचे काम गेल्या दोन महिन्यांपासून बंद असल्याने ग्रामस्थ, शेतकरी, विद्यार्थी तसेच भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस खराब होत असून अपघाताचा धोकाही वाढला आहे. पावसाळा जवळ आल्याने संबंधित विभागाने व ठेकेदाराने तातडीने दखल घेऊन रखडलेले काम सुरू करावे आणि रस्ता लवकरात लवकर पूर्ण करावा,

**- त्रस्त नागरिक व प्रवासी डावरगाव देवी**

### खराब रस्त्यामुळे अपघाताचा धोका

ररस्त्याचे काम गेल्या दोन महिन्यांपासून बंद असल्याने रस्त्यावर धूळ, गिट्टी व दगड उघडे पडले आहेत. त्यामुळे वाहनचालक, शेतकरी, शाळकरी मुले व नागरिकांना मोठा त्रास होत आहे. पावसाळा जवळ आला असून खराब रस्त्यामुळे अपघातांचा धोका तसेच कंबरदुखी, पाठदुखी व श्वसनाचे आजार वाढत आहेत. संबंधित विभागाने तातडीने काम पूर्ण करावे.

**- प्रताप पाटील नवले, सामाजिक कार्यकर्ते**

# प्रभाग क्रमांक ५ मध्ये घाणीचे साम्राज्य; नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू

## क्रांतीनगर ते बडी सडक परिसरात अस्वच्छतेचा कळस; महिन्यातून एकदाच कचरा गाडी येत असल्याचा आरोप, आंदोलनाचा इशारा

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ५ मधील नागरिक सध्या अस्वच्छता, दुर्गंधी आणि डासांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे अक्षरशः त्रस्त झाले आहेत. क्रांतीनगर, मुरारी नगर, शिश विहार स्कूल परिसर, जहीर मिया का बंगला, अब्दुल हमीद चौक आणि बडी सडक या संपूर्ण भागात कचऱ्याचे ढीग साचल्याने परिसराचे रूपांतर घाणीच्या साम्राज्यात झाले असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

स्थानिक नागरिकांनी मोठ्या अपेक्षेने लोकप्रतिनिधींना निवडून दिले. मात्र निवडणुका संपल्यानंतर परिसरातील मूलभूत समस्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी निवडून दिलेले नगरसेवक नेमके कुठे आहेत? असा संतप्त सवाल आता परिसरातील नागरिक उघडपणे विचारू लागले आहेत.

परिसरातील नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक भागांत नियमित कचरा संकलन होत नसल्यामुळे रस्त्याच्या कडेला,



मोकळ्या जागांमध्ये आणि नाल्यांच्या आसपास कचऱ्याचे ढीग साचले आहेत. काही ठिकाणी महिन्यातून केवळ एकदाच कचरा संकलन गाडी येत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे उर्वरित दिवसांमध्ये कचरा टाकण्यासाठी कोणतीही व्यवस्था उपलब्ध नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

कुजणाऱ्या कचऱ्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून डासांचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढले आहे. परिणामी लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा गंभीर परिणाम होत आहे. डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया आणि इतर संसर्गजन्य आजारांचा धोका वाढत असल्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

नागरिकांनी या समस्येबाबत अनेक वेळा महानगरपालिका प्रशासनाकडे तक्रारी केल्या. स्वच्छता विभागाशी संपर्क साधण्याचा प्रयत्नही करण्यात आला. मात्र स्वच्छता निरीक्षकांकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. अनेकदा *(पान २ वर)*

# नाफेडच्या अतिरिक्त नफ्यातून सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल सातशे रुपये बोनस द्या

## डॉ. सुयोग कुलकर्णी यांची कृषी मूल्य आयोगाकडे मागणी

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी नाफेडला होत असलेल्या अतिरिक्त नफ्यातून किंवा शासनामार्फत प्रति क्विंटल किमान ७०० रुपये बोनस तातडीने जाहीर करावा, अशी मागणी अखिल महाराष्ट्र डाळिंब उत्पादक संशोधन संघाचे माजी सचिव व बांबू लागवड चळवळीचे जिल्हा समन्वयक डॉ. सुयोग सुरेश कुलकर्णी यांनी कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांच्यामार्फत शासनाकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

डॉ. सुयोग यांनी सदर निवेदनात म्हटले आहे की, सन २०२५-२६ मध्ये महाराष्ट्रातील



लाखो सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी आपले सोयाबीन हमीभाव योजनेअंतर्गत नाफेडच्या खरेदी केंद्रावर प्रति क्विंटल ५ हजार ३१८ रुपये या दराने विकले होते. नाफेडची खरेदी नोंदणी प्रक्रिया ३१ जानेवारीपर्यंत सुरू होती. त्या काळात खुल्या बाजारात सोयाबीनचे भाव कमालीचे घसरल्यामुळे, आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांनी आपला माल नाफेडला विकला होता. परंतु, गेल्या चार-पाच महिन्यांत सोयाबीनच्या बाजारभावात मोठी वाढ झाली असून, सध्या नाफेडकडून तेच सोयाबीन जवळजवळ ७ हजार ३०० रुपये प्रति क्विंटल दराने खुल्या बाजारात विकले जात आहे. यामुळे नाफेडला मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त नफा मिळत आहे. मात्र, रात्रीचा दिवस करून कापूस-सोयाबीन पिकवणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्यांना या वाढीव दराचा किंवा नफ्याचा कोणताही लाभ मिळालेला *(पान २ वर)*

# संपादकीय...

## तथ्य पडताळणीशिवाय दावे धोकादायक; सोन्यावरील चर्चेत जबाबदारीचे भान आवश्यक

देशात सोने हा केवळ मौल्यवान धातू नाही, तर भारतीय समाजजीवन, संस्कृती, परंपरा आणि अर्थव्यवस्थेशी जोडलेला भावनिक विषय आहे. लग्नसराई, सण-उत्सव, गुंतवणूक आणि कौटुंबिक सुरक्षितता यांच्याशी सोन्याचे अतूट नाते आहे. त्यामुळे सोन्याबाबत कोणतेही विधान, सरकारी धोरण किंवा सार्वजनिक आवाहन समोर आले की त्याची व्यापक चर्चा होणे स्वाभाविक आहे.

जालना येथे आयोजित एका पत्रकार परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना वर्षभर सोने खरेदी करू नये असे आवाहन केल्याचा उल्लेख झाला आणि त्यावर अभिनेत्री प्राजक्ता माळी तसेच ज्वेलरी व्यावसायिकांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्याचे वृत्त समोर आले. मात्र या संपूर्ण चर्चेतील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अशा दाव्यांची सत्यता आणि त्याची अधिकृत पडताळणी. लोकशाही व्यवस्थेत पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा कोणत्याही सार्वजनिक पदावरील व्यक्तीचे विधान मोठ्या प्रमाणावर परिणाम करणारे असते. त्यामुळे अशा विधानांचा संदर्भ, उद्देश आणि मूळ स्वरूप समजून घेणे अत्यंत आवश्यक असते. अनेकदा एखाद्या भाषणातील विशिष्ट भाग, आर्थिक सल्ला किंवा व्यापक धोरणाचा संदर्भ वेगळ्या पद्धतीने मांडला जातो आणि त्यातून गैरसमज निर्माण होतात. सोशल मीडियाच्या युगात ही समस्या अधिक गंभीर बनली आहे.

पत्रकारितेचा मूलभूत आधार म्हणजे तथ्यांची पडताळणी. कोणतेही विधान प्रकाशित करण्यापूर्वी त्याचा अधिकृत स्रोत तपासणे, संबंधित भाषणाचा संपूर्ण संदर्भ पाहणे आणि आवश्यक असल्यास सरकारी किंवा अधिकृत नोंदींची खातरजमा करणे ही माध्यमांची जबाबदारी आहे. कारण चुकीची किंवा अपूर्ण माहिती केवळ जनमत गोंधळात टाकत नाही, तर आर्थिक व्यवहारांवरही परिणाम करू शकते.

दुसरीकडे, सोने खरेदीबाबतची मानसिकता ही केवळ सरकारी आवाहनांवर अवलंबून नसते. भारतीय कुटुंबांमध्ये सोने हे बचतीचे आणि सुरक्षित गुंतवणुकीचे साधन मानले जाते. ग्रामीण भागात तर अनेक कुटुंबांसाठी ते आर्थिक संकटाच्या काळातील आधार असते. त्यामुळे सोन्याच्या मागणीवर परिणाम करणारे घटक हे प्रामुख्याने बाजारभाव, महागाई, उत्पन्नाची पातळी आणि सामाजिक परंपरा हेच असतात.

या घटनेतून एक महत्त्वाचा संदेश समोर येतो. तो म्हणजे सार्वजनिक चर्चेत सहभागी होणाऱ्या सर्व घटकांनी-राजकारणी, कलाकार, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते आणि माध्यमांनी-तथ्यांच्या आधारावर भूमिका मांडली पाहिजे. मतभिन्नता असू शकते, प्रतिक्रिया असू शकतात; परंतु त्या पडताळलेल्या माहितीवर आधारित असणे आवश्यक आहे.

आजच्या माहितीच्या वेगवान युगात सर्वात मौल्यवान गोष्ट सोनं नाही, तर विश्वासार्ह माहिती आहे. आणि तो विश्वास टिकविण्याची सर्वात मोठी जबाबदारी माध्यमांवर आहे. त्यामुळे कोणताही दावा, विशेषतः देशाच्या पंतप्रधानांशी संबंधित दावा, अधिकृत स्रोतांच्या पडताळणीनंतरच जनतेसमोर मांडला गेला पाहिजे. कारण जबाबदार पत्रकारिता ही केवळ बातमी देत नाही, तर समाजाला सत्याची दिशा दाखवते.

# जलसंपदा विभागाची १४ कार्यालये नाशिक-अहिल्यानगरला हलवण्याचा निर्णय; मराठवाड्यातून तीव्र विरोध

**परतूर - प्रतिनिधी**

जलसंपदा विभागाची मराठवाड्यातील १४ कार्यालये नाशिक व अहिल्यानगर येथे स्थलांतरित करण्याचा शासन निर्णय झाल्याने मराठवाड्यात संतापाची लाट उसळली आहे. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत गवळी यांनी याबाबतचे आदेश काढले आहेत. या निर्णयाचा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जालना जिल्हा उपाध्यक्ष डॉ. प्रदिप चव्हाण यांनी तीव्र निषेध केला आहे. डॉ. चव्हाण म्हणाले की, मराठवाड्याचा सिंचन अनुशेष गेल्या ७० वर्षांत केवळ ३३५ टीएमसी इतकाच भरला आहे. अजूनही २६० टीएमसीचा अनुशेष बाकी आहे. असे असताना मराठवाड्याचे हक्काचे पाणी मिळवण्यासाठी अडकाठी करणाऱ्या नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यात कार्यालये हलवणे म्हणजे मराठवाड्याला पाण्यापासून वंचित ठेवण्याचे षडयंत्र आहे.

या निर्णयामुळे येत्या २ वर्षांत मराठवाड्याचे वाळवंट होईल. मराठवाड्याला परावलंबी करून अपंग करण्याचा हा भाजपाचा डाव आहे, असा जळजळीत आरोप डॉ. चव्हाण यांनी केला. ज्या भागाचा सिंचन अनुशेष बाकी आहे, तेथीलच कार्यालये हलवण्याचा हा 'मोहमद तुघलकी' निर्णय असल्याची टीका त्यांनी केली. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांना 'राज्य शासनातील मोहमद तुघलक' असेही त्यांनी संबोधले. डॉ. प्रदिप चव्हाण हे गेल्या २०-२५ वर्षांपासून सिंचन, धरण व पुनर्वसन क्षेत्रातील अभ्यासक आहेत. ते छत्रपती संभाजीनगर विभागीय पुनर्वसन समितीचे माजी सदस्य असून सध्या जालना जिल्हा पुनर्वसन हस्तांतरण व दर्जा तपासणी समितीचे सदस्य आणि महाराष्ट्र राज्य धरणग्रस्त कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष आहेत. डॉ. चव्हाण यांनी इशारा दिला की, या निर्णयामुळे मराठवाड्याचा सिंचन अनुशेष वाढून हक्काचे पाणी कधीच मिळणार नाही. शेतीवर परिणाम होऊन शेतकरी भिकेला लागेल. आम्ही हे होऊ देणार नाही. लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे सिंचन क्षेत्रातील तज्ञांची बैठक घेऊन मुख्यमंत्र्यांची भेट घेऊ. हा निर्णय रद्द करायला भाग पाडू. हक्काचे पाणी मिळवण्यासाठीचा लढा आणखी तीव्र करू. गरज पडल्यास सत्ताधारी मंत्र्यांना मराठवाड्यात फिरणे मुश्किल करू.

दरम्यान, शासनाकडून या कार्यालय स्थलांतरामागील अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट करण्यात आलेली नाही. मराठवाड्यातील शेतकरी संघटनांनीही या निर्णयाविरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# विषारी दारूचे बळी

पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात विषारी दारू प्यायल्याने गेल्या तीन दिवसात २३ जणांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेने राज्यभर खळबळ माजली आहे. विषारी दारूच्या या मृत्यकांडाने सर्वसामान्य नागरिकांनाच नाही तर सरकारलाही धक्का बसला आहे म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले असून या दारूकांडला जबाबदार असणाऱ्या काही अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई देखील केली आहे. अर्थात सरकारने केलेली ही कारवाई योग्यच आहे असे म्हणावे लागेल कारण संबंधित अधिकाऱ्यांनी जर आपले कर्तव्य चोख बजावले असते तर हे २३ जीव वाचले असते. आता या दारुकांडाची सखोल चौकशी होऊन दोषींवर कारवाई होईल अशी अपेक्षा करायला हरकत नाही. या विषारी दारूकांडाने सपूर्ण महाराष्ट्रात खळबळ माजली असली तरी विषारी दारू पिऊन मृत्यूकांड घडल्याची ही देशातील पहिली घटना नाही याआधी अशा अनेक घटना घडल्या असून त्यात अनेकांचा जीव गेला आहे. दरवर्षी देशात कोठेना कोठे अशा घटना घडतच असतात. मागील वर्षी बिहारमध्ये अशी घटना घडली होती आणि त्यात ७ जणांचा मृत्यू झाला होता. त्याआधी ऑक्टोबर २०२४ मध्ये बिहारमध्येच ४० जणांचा विषारी दारूने बळी घेतला होता. २०२२ साली तर बिहारमधील छपरा जिल्ह्यात ७३ जणांना विषारी दारूने जीव गमवावा लागला होता. बिहारमधीलच गोपालगंज येथे २०१६ साली १६ लोक विषारी दारूचे बळी ठरले होते. विशेष म्हणजे बिहारमध्ये संपूर्ण दारू बंदी आहे असे असतानाही तिथे खुलेआम दारूविक्री होते. पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि पंजाबमध्येही अशा घटना घडल्या आहेत. पंजाबमध्ये तर विषारी दारूने एकाच वेळी ९० जणांचा बळी घेतला होता. काही वर्षांपूर्वी मुंबईतही अशी दुर्दैवी घटना घडली होती. विषारी दारूने आजवर देशात शेकडो लोकांचा बळी गेला आहे तरीही त्यातून काही धडा घेतला जात नाही. आताही मुख्यमंत्र्यांनी या घटनेच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाईचे संकेतही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत ही स्वागतार्ह बाब असली तरी त्यातून काही सध्या होईल असे वाटत नाही. एखादी दुर्दैवी घटना घडली आणि त्यात काही नागरिकांचा बळी गेला की, त्या घटनेची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग नेमला जातो पण त्या चौकशी आयोगाचे पुढे काय होते ? त्यातून दोषींना शक्षिा होते का ? शक्षिा होते तर मग अशा घटनांची पुनरावृत्ती का होते ? हे प्रश्न अनुत्तीर्णच राहतात. मुळात अशा घटना घडूच नयेत यासाठी सरकार काय प्रयत्न करते हे महत्वाचे आहे. विषारी दारू उत्पादन करून ती विकली जात असताना पोलिस आणि प्रशासन काय करत होती हा खरा प्रश्न आहे. दारूची निर्मिती करणारे दारूमध्ये अल्कोहोल, धतुरा आणि युरिया टाकतात. ही दारू बनवण्यासाठी नवसागर आणि मिथेनॉल यासारख्या रसायनांचा देखील वापर केला जातो. हे सर्व पदार्थ मानवी शरीरासाठी हानिकारक आहे हे माहीत असतानाही त्याचा दारुसाठी सर्रास वापर केला जातो.

ही दुदैवी घटनाही मिथेनॉलमुळे झाल्याचा प्राथमिक अंदाज न्यायवैद्यक तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. आपल्या देशात विनापरवाना दारू विक्री करणे हा गुन्हा असताना गाव खेड्यातच नव्हे तर शहरातही अवैध दारूच्या भट्ट्या जागोजागी दिसतात. या भट्ट्यांमध्ये अवैध पद्धतीने दारू उत्पादित केली जाते. हे पोलिसांसह प्रशासनाला माहीत देखील असते पण या दारू माफियांनी पोलिसांसह प्रशासनाचेही हात आधीच ओले केले असल्याने ते याकडे कानाडोळा करतात. त्याचा परिणाम म्हणून अशा दुर्दैवी घटना घडतात. एखादी मोठी दुर्दैवी घटना घडली किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांचा दौरा असला तरच कारवाईचे नाटक केले जाते आणि काही दिवसांनी पुनश्च हरीओम होतो. दारू माफिया व पोलिस आणि प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी यांच्या अभद्र युतीमुळेच अशा दुर्दैवी घटना घडतात. जोवर ही भ्रष्ट युती तुटत नाही आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई होत नाही तोवर अशा घटना थांबतील असे वाटत नाही. या घटनेची देशभर चर्चा झाल्याने पुणे पोलिसांवरील दबाव वाढला त्यामुळे त्यांनी काही लोकांना अटक केली. मात्र ही कारवाई एवढ्यावरच न थांबवता पोलिसांनी यामागील पाळेमुळे शोधून काढली पाहिजे. दारू माफिया कितीही मोठा असला तरी त्याच्यावर कारवाई करण्याची धमक पोलिसांनी दाखवायला हवी. अर्थात दारू पिणारे लोक त्यांच्याकडे येतात म्हणूनच ते दारू विकतात हे ही तितकेच खरे आहे. दारूच्या आहारी गेलेले लोक दारू मिळाली नाही तर जी दारू मिळेल ती पितात. आपण जी दारू पितो तिच्यामुळे आपला जीवही जाऊ शकतो याचेही भान त्यांना नसते दारू माफियांवर कारवाई करण्यासोबतच दारूच्या आहारी गेलेल्या लोकांचे समुपदेशन करून त्यांना व्यसनमुक्त करण्यासाठी देखील शासनस्तरावरून प्रयत्न व्हायला हवेत.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# जागृती शुगरला सर्वोत्कृष्ट तांत्रिक संचालन व नवीनत्तम कार्याचा प्रथम पुरस्कार




**लातूर । प्रतिनिधी**

वेस्ट इंडियन शुगर मिल असोसिएशन (विस्मा) यांच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय सर्वोत्तम तांत्रिक संचालन व नविनत्तम कार्य मानाचा पुरस्कार लातूर जिल्ह्यातील तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज या कंपनीला शनिवारी शानदार सोहळ्यात पुणे येथे प्रदान करण्यात आला.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, संचालक दिलीप माने, सरव्यवस्थापक गणेश येवले यांनी पुरस्कार स्वीकारला. या अत्यंत मानाच्या पुरस्कारामुळे राज्य पातळीवरील साखर उद्योगात लातूरच्या जागृती शुगर इंडस्ट्रीजचे नाव कोरले आहे. राज्याचे माजी मंत्री तथा जागृति शुगरचे संस्थापक दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जागृती शुगर इंडस्ट्रीजच्या अध्यक्षा व कार्यकारी संचालक गौरवी अतुल भोसले (देशमुख) यांच्या नेतृत्वाखाली गेली १६ वर्षांपासून साखर कारखान्याची दैदिप्यमान वाटचाल सुरू आहे हे विशेष. या भव्यदिव्य कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील माजी मंत्री आ. दिलीप वळसे पाटील, राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले, साखर आयुक्त संजय कोलते, बी. बी. ठोंबरे यांची उपस्थिती होती.

जागृती शुगर इंडस्ट्रीज मागच्या १६ वर्षाच्या गळीत हंगामात मोठ्या प्रमाणात उसाचे गाळप करत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपी पेक्षा अधिक भाव देत या भागात शेतकऱ्यांना आर्थिक सुबत्ता देण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष दिलीपराव देशमुख यांचे सूक्ष्म नियोजन आहे. केवळ उस गाळप इतक्यावरच न राहता शुगर इंडस्ट्रीजने इथेनॉल, वीज, सी बी जी गॅस आदी विविध नवनवीन तंत्रज्ञान वापरून प्रकल्प हाती घेतले आहेत.

# पान १ व ४ वरुन....

## तेच वाहन...

ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ यांच्या फिर्यादीवरून गुन्हा क्रमांक २८४/२०२६ दाखल करण्यात आला असून भारतीय दंड विधानातील कलम १२३, २७३ आणि २२३(३)(५) अन्वये पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांसमोर आता या प्रतिबंधित मालाचा खरा मालक कोण, हा महत्त्वाचा प्रश्न उभा राहिला आहे. जप्त करण्यात आलेली वाहने बेवारस अवस्थेत आढळल्याने या प्रकरणामागील मुख्य सूत्रधार अद्याप समोर आलेला नाही.

जप्त वाहनाच्या पूर्व इतिहासामुळे संशय या कारवाईतील सर्वाधिक चर्चेचा मुद्दा म्हणजे -२१--८१९९ क्रमांकाचे महिंद्रा बोलेरो पिकअप वाहन. उपलब्ध माहितीनुसार याच वाहनावर यापूर्वी बदनापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रतिबंधित गुटखा प्रकरणात कारवाई करण्यात आली होती. त्या प्रकरणात सतीश ऊर्फ लाला जैस्वाल याचे नाव समोर आले होते आणि त्याच्याविरुद्ध गुन्हाही नोंद करण्यात आल्याची माहिती मिळत आहे. विशेष म्हणजे, पुन्हा एकदा त्याच वाहनातून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा आढळून आल्याने या प्रकरणाचे धागेदोरे पूर्वीच्या नेटवर्कशी जोडले जात असल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे या गुटखा साठ्यामागे नेमके कोण आहे, याबाबत विविध तर्कवितर्क लावले जात आहेत.

**लालाचा शोध कधी लागणार?**

काही काळापूर्वी गुटखा तस्करीसंदर्भातील प्रकरणांमध्ये चर्चेत आलेल्या सतीश ऊर्फ लाला जैस्वाल याच्याबाबत पुन्हा एकदा चर्चा रंगू लागली आहे. संबंधित वाहनाचा पूर्व इतिहास आणि सद्यस्थितीत त्याच वाहनातून प्रतिबंधित माल जप्त झाल्याने तपास यंत्रणांचे लक्ष त्याच्याकडे वळले आहे.

स्थानिक स्तरावर अशी चर्चा सुरू असली तरी पोलिसांनी अद्याप कोणत्याही व्यक्तीचे नाव अधिकृतपणे जाहीर केलेले नाही. त्यामुळे तपासातून पुढे कोणती नावे समोर येतात आणि या अवैध व्यवसायामागील मुख्य साखळी उघड होते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच रमेश राठोड, प्रभाकर वाघ, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, सुधीर वाघमारे, इरशाद पटेल, शिवप्रसाद एखंडे आणि कैलास चेके यांनी सहभाग घेतला. जालना जिल्ह्यातील गुटखा तस्करीविरोधातील ही कारवाई महत्त्वाची मानली जात असली तरी या प्रकरणामागील खरे सूत्रधार समोर येईपर्यंत तपासाकडे सर्वांचे लक्ष लागून राहणार आहे.

## जालना मनपाच्या...

झालेल्या अतिक्रमणामुळे पावसाळ्यात नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. नालेसफाई व अतिक्रमण हटविण्यासाठी तक्रारदाराने महानगरपालिकेकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. मात्र संबंधित कारवाई करण्यासाठी दोन्ही अधिकाऱ्यांनी ४० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे.लाचेची मागणी होत असल्याची खात्री झाल्यानंतर तक्रारदाराने थेट छत्रपती संभाजीनगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. ने प्राथमिक पडताळणी केली असता लाचेची मागणी झाल्याचे स्पष्ट झाले.

**ए.सी.बी चा सापळा अन् रंगेहात अटक**

पडताळणी पूर्ण झाल्यानंतर पथकाने २८ मे रोजी जालन्यात नियोजनबद्ध सापळा रचला. ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम स्वीकारताना दोन्ही अधिकाऱ्यांना रंगेहात पकडण्यात आले. या कारवाईमुळे महानगरपालिका प्रशासनात एकच खळबळ उडाली होती.

ने दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्यानंतर २९ मे रोजी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली होती.

**न्यायालयीन कोठडीची सुनावणी**

पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर सोमवारी (१ जून) आरोपींना पुन्हा न्यायालयासमोर हजर करण्यात आले. सुनावणीअंती न्यायालयाने दोन्ही आरोपींना १२ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यामुळे आता पुढील काही दिवस आरोपींना कारागृहात राहावे लागणार आहे.

**आर्थिक व्यवहारांचीही चौकशी**

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कडून आरोपींच्या आर्थिक व्यवहारांची, मालमत्तेची तसेच यापूर्वी अशाच प्रकारच्या तक्रारींचीही चौकशी केली जात आहे. या प्रकरणाशी संबंधित आणखी काही बाबी समोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**शहरभर चर्चेचा विषय**

महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना लाच घेताना रंगेहात पकडण्यात आल्याने हे प्रकरण जालना शहरात चर्चेचा विषय ठरले आहे. नागरिकांच्या कामांसाठी पैसे मागितल्याच्या आरोपांमुळे मनपाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, या प्रकरणात आणखी काही धक्कादायक माहिती समोर येते का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## प्रभाग क्रमांक ५...

फोन करूनही संपर्क होत नसल्याने नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी नाराजी वाढत आहे.

परिसरातील नागरिकांचे म्हणणे आहे की, स्वच्छ भारत अभियानाच्या घोषणा केवळ कागदोपत्री राहिल्या असून प्रत्यक्षात शहरातील अनेक भागांमध्ये स्वच्छतेचा पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोपही करण्यात येत आहे.दरम्यान, क्रांतीनगर ते बडी सडक परिसरातील नागरिकांनी आता संयमाचा अंत झाल्याचे स्पष्ट केले आहे. तात्काळ कचरा उचलून नियमित स्वच्छता मोहीम राबविण्यात यावी, डास प्रतिबंधक फवारणी करण्यात यावी आणि कचरा संकलनाची नियमित व्यवस्था सुरू करावी, अन्यथा तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

नागरिकांच्या आरोग्याशी सुरू असलेला हा खेळ त्वरित थांबवून महानगरपालिका प्रशासनाने युद्धपातळीवर स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. अन्यथा वाढता जनआक्रोश प्रशासनासाठी मोठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**नागरिकांच्या प्रमुख मागण्या**

परिसरातील सर्व कचऱ्याचे ढीग तात्काळ हटवावेत नियमित कचरा संकलन गाडीची व्यवस्था करावी डास प्रतिबंधक फवारणी व औषध फवारणी करावी नाल्यांची स्वच्छता व साफसफाई तातडीने करावी स्वच्छता विभागाच्या कामकाजावर देखरेख ठेवावी

संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी

**संतप्त प्रतिक्रिया**

आम्ही कर भरतो, पण मूलभूत स्वच्छताही मिळत नाही. कचऱ्यामुळे मुलांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी. - स्थानिक नागरिक

महिन्यातून एकदाच कचरा गाडी येत असेल तर नागरिकांनी कचरा नेमका कुठे टाकायचा? प्रशासनाने याचे उत्तर द्यावे. - परिसरातील रहिवासी

## नाफेडच्या अतिरिक्त...

नाही, ही अत्यंत खेदजनक बाब आहे. शेतकऱ्यांनीच कष्ट करून उत्पादित केलेल्या मालावर आज नाफेडला कोट्यवधी रुपयांचा नफा होत असताना, त्या नफ्यात शेतकऱ्यांचाही न्याय्य वाटा असणे आवश्यक आहे. देशातील इतर राज्य सरकारेदेखील शेतकऱ्यांना हमीभावाव्यतिरिक्त बोनस देऊन आर्थिक दिलासा देत आहेत. यापूर्वी मध्य प्रदेश सरकारने गव्हाच्या हमीभावाव्यतिरिक्त १२५ ते १७५ रुपये प्रति क्विंटलपर्यंत बोनस दिला आहे तसेच कर्नाटक सरकारनेही तूर उत्पादक शेतकऱ्यांना अतिरिक्त बोनस देऊन दिलासा दिला होता. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनाही नाफेडला झालेल्या नफ्यातून किमान ७०० रुपये प्रति क्विंटल बोनस देण्यात यावा, ही शेतकऱ्यांची रास्त व न्याय्य मागणी आहे. यामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार मिळेल, असेही डॉ. कुलकर्णी यांनी निवेदनात नमूद केले आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन या मागणीचा शासन दरबारी गांभीर्याने पाठपुरावा करून ती तातडीने मंजूर करून घ्यावी, अशी विनंती करणार असल्याचे डॉ. सुयोग कुलकर्णी यांनी म्हटले आहे.

## टेंभुर्णी पोलीस...

काम करणाऱ्या अधिकाऱ्यांपुढे गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याचे मोठे आव्हान नेहमी असते.

अशा परिस्थितीत नव्याने रुजू झालेले सपोनि अविनाश राठोड यांच्याकडे नागरिकांच्या अपेक्षा आहे. गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा, सर्वसामान्य नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करणे आणि कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करणे या बाबी त्यांच्या कार्यकाळातील प्रमुख कसोटी ठरणार आहेत. टेंभूर्णी परिसरातील अनेक नागरिकांनी नव्या अधिकाऱ्यांकडून धाडसी आणि परिणामकारक कारवाईची अपेक्षा व्यक्त केली आहे. विशेषतः अवैध धंद्यांचे जाळे मोडून काढण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याची गरज असल्याचे मत नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

टेंभूर्णी पोलीस ठाण्याच्या नेतृत्वात झालेल्या या बदलामुळे परिसरातील कायदा-सुव्यवस्थेची स्थिती अधिक बळकट होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## प्रा.अरुण पडघन...

प्र-अधिष्ठाता डॉ.पराग खडके, प्र- अधिष्ठाता डॉ.माधवराव पाटील,प्राचार्य डॉ.मा.मा.जाधव (अध्यक्ष,मराठी भाषा अभ्यास मंडळ ,स्वारातीम विद्यापीठ, नांदेड. ) प्राचार्य डॉ रामचंद्र भिसे यांनी शुभेच्छा देत अभिनंदन केले. पी.एचडी पदवी संपादन केल्याबद्दल हेमंतराव जामकर (अध्यक्ष, नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था,परभणी.)संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.किरणराव सुभेदार, कोषाध्यक्ष डॉ.अभयराव सुभेदार, सचिव विजयराव जामकर, सहसचिव डॉ. संजयराव टाकळकर , संचालक सौ. दिपलक्ष्मीताई जामकर, ॲड. बाळासाहेब जामकर, ॲड. मंगेशराव सुभेदार, सौ. कविताताई सुभेदार, गोविंदराव नांदापूरकर, संग्राम भैय्या जामकर, ॲड. पुरुषोत्तम पाटील, प्रो. डॉ. सुवर्णा पाटील, प्राचार्य डॉ.वसंतराव भोसले, प्राचार्य डॉ.अशोक तेजनकर, प्रा.डॉ.शिवानंद भानूसे, इंजि.अरुण मराठे, प्राचार्य डॉ. विनायक क्षिरसागर , प्राचार्य डॉ.के.के.पाटील ,प्रा.डॉ. देविदास भागवत , प्रा.डॉ.मल्हारीकांत सोंडगे, प्रा.डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण , प्रा.डॉ सचिन खडके, अजमत खान, विद्यापीठ प्रशासनातील प्रकाश चित्ते, लक्ष्मण जाधव ,त्र्यंबक आव्हाड,सादीक पठाण, शेख.शहाबुद्दीन,दिलीप पडघन, गोविंद पवार यांचे सह महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक , कर्मचारी आदींनी अभिनंदन केले.

या कामी प्रा.विरराजे म्हसलकर,प्रा.डॉ.विश्वनाथ शेळके, डॉ.मारोती कोल्हे, प्रा.डॉ.प्रविण नादरे , प्रा.डॉ.दिनेश धनेश्वर ,गणेश कुटे, गणेश खरात, चैतन्य पडघन, सौ.रंगोली व अभिलाषजी सोनूने, सौ.अंजलीताई व विष्णुजी सोनूने, सौ. चारुशीला पडघन, पडघन परिवार, मित्र मंडळ आदींचे सहकार्य लाभले. सर्वच स्तरातून प्रा. डॉ. अरुण पडघन यांचे अभिनंदन होत आहे.

# गुलामगिरीच्या निर्मूलनासाठी राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांचे तत्त्वज्ञान समजून घेणे आवश्यक बी. बी. मेश्राम

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १७३ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

: फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघ यांच्या संयुक्त विद्यमाने गुलामगिरी ग्रंथाच्या १५३ व्या वर्धापन दिनानिमित्त ''राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांनी 'गुलामगिरी' हा ग्रंथ निग्रोंना का अर्पण केला असावा?'' या ऐतिहासिक व समकालीन विषयावर आयोजित १७३ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा साकेतनगर येथील संस्थेच्या कार्यालयात उत्साहात पार पडली. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम होते. अध्यक्षीय मार्गदर्शनात त्यांनी सांगितले की, महात्मा ज्योतिबा फुले यांनी 'गुलामगिरी' या ग्रंथाच्या प्रारंभीच अमेरिकेतील सदाचारी लोकांनी गुलामांना दास्यत्वातून मुक्त करण्यासाठी दाखविलेल्या औदार्य,



निरपेक्षता आणि परोपकारबुद्धीचा गौरव केला आहे. त्यांच्या सन्मानार्थ हा ग्रंथ अर्पण करण्यात आला असून, भारतीय शूद्र-अतिशूद्र समाजालाही गुलामगिरीविरोधी संघर्षाची प्रेरणा मिळावी हा त्यामागील उद्देश होता. मेश्राम पुढे म्हणाले की, गुलामगिरी स्वीकारल्याने माणसाचे सद्गुण नष्ट होतात, असे होमर यांनी नमूद केले आहे. याच पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'गुलामाला त्याच्या गुलामगिरीची जाणीव करून द्या, तो बंड करून उठेल' असा विचार मांडला. अमेरिकेत रंगभेदाच्या स्वरूपात तर भारतात जात आणि अस्पृश्यतेच्या माध्यमातून गुलामगिरीची पाळेमुळे रुजलेली आहेत. या व्यवस्थेच्या निर्मूलनासाठी महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली आणि पुढे सार्वजनिक सत्यधर्माची मांडणी करून सामाजिक परिवर्तनाचा मार्ग दाखविला. त्यामुळे गुलामगिरीच्या निर्मूलनासाठी महात्मा फुले यांचे तत्त्वज्ञान समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उद्घाटनपर भाषणात प्रा. शिवम गायकवाड यांनी प्राचीन काळातील अत्याचारांची उदाहरणे देत गुलामगिरीची भीषणता स्पष्ट केली. जगातील इतर गुलामगिरीच्या तुलनेत भारतातील जातीय गुलामगिरी अधिक भयावह असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रमुख वक्ते ॲड. धनेश गवळी यांनी भारतीय समाजव्यवस्थेवर गुलामगिरी ही एक घातक कीड असल्याचे सांगितले. समाज परिवर्तनासाठी प्रत्येकाने स्वतःमध्ये बंडाची वृत्ती निर्माण करून अन्यायकारी व्यवस्थेविरुद्ध उभे राहण्याची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. यावेळी समन्वयक विलास रामटेके यांनी दीर्घकाळाच्या शोषणामुळे सामाजिक गुलामगिरी कशी बळकट झाली यावर भाष्य केले. ॲड. सुनीलकुमार नागवंश यांनी कष्टकरी वर्गाच्या श्रमांवरच जगाची उभारणी झाल्याचे सांगत स्वातंत्र्यानंतरही बहुतांश जनता विविध प्रकारच्या गुलामगिरीत जीवन जगत असल्याची खंत व्यक्त केली. तसेच फोडा आणि राज्य करा या राजकारणामुळे लोकशाही व शिक्षणव्यवस्था धोक्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. विकास खंदारे यांनी अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता वाढविणाऱ्या व्यवस्थेला तिलांजली देऊन वैज्ञानिक व सामाजिक विचारांचा प्रसार करण्याचे आवाहन केले. राज गायकवाड यांनी धार्मिक व राजकीय गुलामगिरीतून मुक्त होण्याची गरज व्यक्त केली, तर ॲड. डी. बी. मेश्राम यांनी मानसिक गुलामगिरीचे अस्तित्व अधोरेखित करून मानसिकतेत परिवर्तन घडविण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक उद्योजक मिलिंद बागुल यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके यांनी तर आभार प्रदर्शन ॲड. सुनीलकुमार नागवंश यांनी केले.

परतूर-आष्टी रोडवर भीषण अपघात

# हायवाच्या धडकेत तरुण जागीच ठार, चालक फरार

**परतूर - प्रतिनिधी**



परतूर-आष्टी रोडवरील दैठणा फाट्याजवळ आज एका भीषण अपघातात तरुणाचा जागीच मृत्यू झाला. भरधाव हायवाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला. मिळालेल्या माहितीनुसार, रामा आसाराम कोल्हे हे युनिकॉर्न दुचाकीवरून जात असताना समोरून येणाऱ्या चक २१ उघ ८०९२ क्रमांकाच्या हायवाने त्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की रामा कोल्हे यांचा जागीच मृत्यू झाला.अपघातानंतर हायवा चालकाने गाडी घटनास्थळीच सोडून दैठणा गावाकडील ऊसाच्या शेतातून पळ काढला. स्थानिक नागरिकांनी तातडीने गर्दी केली व पोलिसांना कळवले. घटनेची माहिती मिळताच आष्टी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. हायवा जप्त करण्यात आला असून फरार चालकाचा शोध सुरू आहे. चक २१ उघ ८०९२ या क्रमांकावरून गाडी मालकाचा शोध घेण्यात येत आहे. परतूर-आष्टी रोडवर हायवा व इतर अवजड वाहनांचा वेग प्रचंड असतो.

वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे नागरिकांनी वाहतूक पोलिसांकडे गतीरोधक व तपासणी नाके बसवण्याची मागणी केली आहे. रामा आसाराम कोल्हे यांच्या अकाली निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. आष्टी पोलिस पुढील तपास करत आहेत.

# कारसह चालक जळून खाक; जाफ्राबाद चिखली मार्गावर भीषण अपघात

## खासगाव फाट्याजवळ लिंबाच्या झाडाला धडक; चालकाचा होरपळून मृत्यू

**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद-चिखली मार्गावरील खासगाव फाट्याजवळ रविवारी पहाटे झालेल्या भीषण अपघातात अल्टो कारसह चालक जळून खाक झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या अपघातात चालकाचा जागीच मृत्यू झाला असून मृतदेह इतका जळालेला होता की ओळख पटविणेही कठीण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, नितीन प्रभाकर गवळी (वय ३५, रा. रूपनगर, जि. अकोला) हे नाशिकहून अकोल्याकडे आपल्या अल्टो कारने जात होते. पहाटे सुमारे



पाच वाजण्याच्या सुमारास खासगाव फाट्याजवळ त्यांच्या कारने रस्त्यालगत असलेल्या लिंबाच्या झाडाला जोरदार धडक दिली. धडकेनंतर कारने पेट घेतल्याने चालक वाहनातच अडकून पडला आणि होरपळून त्याचा मृत्यू झाला.

**नाशिकहून अकोल्याकडे**

**जाणाऱ्या दुसऱ्या**

वाहनातील त्यांच्या सहकाऱ्यांना बराच वेळ कार मागे येताना दिसली नाही. शोध घेत असताना अपघाताची माहिती समोर आली. प्राथमिक अंदाजानुसार, चालकाला डुलकी लागल्याने वाहनावरील नियंत्रण सुटून हा अपघात घडला असावा, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांच्यासह पोलीस पथक, फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि वैद्यकीय अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा आणि अन्य तपास प्रक्रिया सुरू असून अपघाताचे नेमके कारण तपासाअंती स्पष्ट होणार आहे.

या भीषण अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून जाफ्राबाद-चिखली मार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# टेंभुर्णी येथे अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करून जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. दत्त जिनिंगजवळ उभारण्यात आलेल्या भव्य पुतळ्याजवळ पूजा-अर्चना व आरती करून अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी गावातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पदाधिकारी तसेच होळकर जयंती उत्सव समि तीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने




उपस्थित होते. सरपंच प्रतिनिधी गौतम म्हस्के, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) तालुकाध्यक्ष रामधन कळंबे, सामाजिक कार्यकर्ते जनार्दन झोरे, राजू करवंदे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष अलकेश सोमाणी, मानव सेवा मंडळाचे प्रांत सचिव शेख नसीम, संजय राऊत, प्रदीप म घाडे, राजू खोत, पवन झोरे, माजी सरपंच लक्ष्मण शिंदे, आदी मान्यवरांनी उपस्थित राहून अभिवादन केले. तसेच उत्सव समितीचे प्रमुख अनिल शेजूळ यांच्यासह अनेक समाजबांधव उपस्थित होते. संध्याकाळी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. संपूर्ण गावात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते.

# भीमाशंकर, अष्टविनायक मंदिरांसह शेकडो प्रमुख देवस्थानांचा कायद्याच्या विरोधात रणशिंग!

## राज्यभर घंटानाद, महाआरती, स्वाक्षरी अभियान, तसेच मुंबईतून महाआंदोलनाचा सरकारला इशारा!

**पुणे - प्रतिनिधी**

देवस्थानांच्या जमिनी वाचल्या तरच मंदिरे आणि आपले धर्मकार्य सुरक्षित राहील, त्यामुळे सरकारने या जमिनी अधिग्रहित करण्याचे काम तात्काळ थांबवावे, असा ठाम व स्पष्ट इशारा देत भीमाशंकर ज्योतिर्लिंग देवस्थान आणि अष्टविनायक समितीसह पुणे पंचक्रोशीतील शेकडो प्रमुख देवस्थानांनी 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन (प्रारूप) अधिनियम, २०२६' या कायद्याच्या विरोधात पुण्यातून थेट रणशिंग फुंकले आहे. या जाचक कायद्याला कडाडून विरोध करण्यासाठी आणि सरकारला वेळेत पावले उचलण्याची चेतावणी देण्यासाठी मंदिर महासंघाच्या वतीने पुण्यात महत्त्वपूर्ण बैठका पार पडल्या.

या कायद्याविरोधात पुढील २५ दिवसांत लाखो कायदेशीर हरकती नोंदवण्यासह, राज्यभर व्यापक स्वाक्षरी अभियान, प्रत्येक मंदिरात महाआरती, आगामी पावसाळी अधिवेशनादरम्यान विधिमंडळावर 'घंटानाद आंदोलन' आणि गरज पडल्यास मुंबईच्या आझाद मैदानावर 'महाआंदोलन' छेडण्याचा, तसेच लवकरच 'राज्यस्तरीय देवस्थान भूमी संरक्षक परिषद' आयोजित करण्याचा एकमुखाने निर्धार करत मंदिर विश्वस्तांनी मैदानात उतरण्याची घोषणा केली आहे. पुण्यातील श्री सिद्धिविनायक मंदिर (सारसबाग), खंडोबा मंदिर (आकुर्डी) आणि श्री सियाराम मंदिर, गोशाळा (हडपसर) येथे पार पडलेल्या या बैठकांमध्ये ज्येष्ठ अधिवक्ता एस. के. जैन यांनी, देवस्थानांचे अस्तित्व टिकवण्यासाठी त्यांच्या जमिनी सुरक्षित राहणे अत्यंत आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. माजी धर्मादाय आयुक्त दिलीप देशमुख यांनी या कायद्यामागील शासनाचा हेतू संशयास्पद वाटत असल्याचे सांगत विश्वस्तांना जास्तीत जास्त हरकती नोंदवण्याचे आवाहन केले. तसेच, रांजणगाव महागणपती देवस्थानचे विश्वस्त डॉ. तुषार पाटील पाचुंदकर यांनी अष्टविनायक मंदिरांचा या कायद्याला तीव्र विरोध दर्शवला, तर भीमाशंकर देवस्थानचे अधिवक्ता सुरेश कौदरे यांनी सेवाधार्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची मागणी केली. मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी हा लढा मंदिरांच्या अस्मितेचा असल्याचे सांगत २ जून रोजी विभागीय आयुक्तांना निवेदन देऊन राज्यभर आंदोलनाचा श्रीगणेशा केला जाईल, अशी चेतावणी सरकारला दिली.

या आंदोलनाची रणनीती निश्चित करण्यासाठी आणि प्रत्येक मंदिरात जनजागृतीचे फलक लावून व्यापक लोकचळवळ उभी करण्यासाठी राज्यभरातील प्रमुख विश्वस्त एकवटले आहेत. या बैठकांना भीमाशंकर देवस्थानचे कार्याध्यक्ष मधुकर गवांदे, प्रसाद गवांदे, ग्रामदैवत कसबा गणपतीच्या संगीताताई ठकार, भवानीपेठ पालखी मंदिराचे प्रमोद बेंगरूट, कानिफनाथ मंदिराचे ज्ञानोबा व सुरेश फडतरे, श्रीमंत सरदार खासगीवाले लिमये, निलेश वाळावे (शिरवळ), निवृत्ती बडदे (कोडीत), अखिल मंडई गणेशोत्सव मंडळाचे वांजळे, जेजुरी मार्तंड देवस्थान व दगडूशेठ दत्त मंदिरचे अधिवक्ता थोरवे, आकुर्डी खंडोबा देवस्थानचे अध्यक्ष विठ्ठल काळभोर व उपाध्यक्ष पंढरीनाथ काळभोर, तसेच चतुःश्रृंगी देवस्थानचे ट्रस्टी आणि अधिवक्ता वृषाली दातार यांसह विधी व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आपला नम्र,**
**श्री. सुनील घनवट,**
**राष्ट्रीय संघटक, मंदिर महासंघ,**
**(संपर्क : ७०२०३८३२६४)**

# सोपान मारोती शिंदे यांना राज्यशास्त्र विषयात पीएच.डी

**बदनापूर - प्रतिनिधी**

बदनापूर तालुक्यातील ढोकसाळ येथील सोपान मारोती शिंदे यांनी आपल्या ज्ञानाचा ओघ कायम वाढवत ठेवून ढोकसाळ गावातून पहिल्यांदा विद्या वाचस्पती (पीएच.डी.) होण्याचा बहुमान मिळविला आहे. छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला राज्यशास्त्र विषयात प्रा. डॉ. रविंद्र काळे, बलभीम महाविद्यालय, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर या संशोधन केंद्रावर'जालना जिल्हयातील ग्रामीण विकासात ग्रामपंचायत पदाधिकारी व प्रशासन यांची भूमिका एक चिकित्सक अभ्यास २००१ ते २०२०' या विषयावर संशोधन कार्ये पुर्ण केले आहे.



शासनाच्या योजनेमुळे ग्रामीण भागाचा होत असलेला विकास, योजनाचे पुनर्जिवन करणे, महिला सक्षमीकरण, प्रस्थापित नेत्यांची हुकूमशाही यावर प्रकाश टाकला आहे. १८ मे २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरच्या राज्यशास्त्र विभाग प्रमुख तथा कुलसचिव प्रो.डॉ. प्रशांत अमृतकर सरांच्या अध्यक्षतेखाली, बहि:स्थ परिक्षक प्रो.डॉ.रविंद्र माळी, किसान कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, पारोळा, जि. जळगांव, संशोधन केंद्र संचालक प्रो.डॉ. शाम कदम, देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर, संशोधनन मार्गदर्शक प्रो. डॉ. रविंद्र काळे, बलभीम महाविद्याल, बीड यांच्यासह प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी यांच्या समक्ष पीएच.डी. मौखिक परिक्षा चांगल्या प्रकारे संपन्न झाला असून डॅसोपान मारोती शिंदे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी विद्या वाचस्पती (पीएच.डी.) पदवी बहाल केली आहे. याबद्दल डॉ. सोपान शिंदे यांचे मित्र परिवार व सर्वस्तरातून अभिनंदन व स्वागत होत आहे.

# सीटीईटी प्रमाणपत्र डाऊनलोड करण्यात डिजी लॉकरचा खोडा; हजारो महिला उमेदवारांचे भवितव्य टांगणीला

## केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाकडे (CBSE) पर्यायी व्यवस्था करण्याची शेख अब्दुल रहीम यांची मागणी

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा () उत्तीर्ण होऊनही केवळ तांत्रिक त्रुटींमुळे हजारो पात्र उमेदवारांना, विशेषतः महिलांना आपली प्रमाणपत्रे मिळवणे कठीण झाले आहे. डिजी लॉकर () आणि आधार कार्डावरील नावातील तफावतीमुळे प्रमाणपत्र डाऊनलोड होत नसल्याने अनेक सुशिक्षित बेरोजगार शिक्षकांच्या नोकरीची संधी हुकण्याची भीती निर्माण झाली आहे. या गंभीर समस्येकडे हॅपी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन चे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम यांनी सीबीएसई () संचालकांचे पत्राद्वारे लक्ष वेधले असून, अधिकृत संकेतस्थळावर पर्यायी डाऊनलोड यंत्रणा सुरू करण्याची मागणी केली आहे.

सध्या सीबीएसईतर्फे सीटीईटीची प्रमाणपत्रे केवळ डिजी लॉकर या डिजिटल मंचावरच उपलब्ध करून दिली जातात. मात्र, डिजी लॉकरवरून प्रमाणपत्र डाऊनलोड करण्यासाठी उमेदवाराचे नाव आणि त्याच्या आधार कार्डावरील नाव तंतोतंत जुळणे बंधनकारक आहे. याच नियमामुळे सध्या हजारो उमेदवारांसमोर मोठे प्रशासकीय संकट उभे राहिले आहे.

**मुख्य अडचणी काय आहेत?**

दहावीचे प्रमाणपत्र विरुद्ध आधार कार्ड: नियमानुसार उमेदवारांना सीटीईटीचा अर्ज १० वीच्या () प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणेच भरावा लागतो. परंतु, अनेकांच्या आधार कार्डावर किरकोळ स्पेलिंग किंवा नावाच्या उच्चारात बदल असतो (उदा. विरुद्ध ). अशा किरकोळ बदलांमुळेही डिजी लॉकर प्रमाणपत्र



देण्यास नकार देत आहे.

विवाहानंतर बदललेली नावे (महिला उमेदवारांची कोंडी): अनेक महिला उमेदवारांनी लग्नानंतर आधार कार्डावर पतीचे नाव आणि आडनाव अपडेट केले आहे. मात्र, त्यांच्या शैक्षणिक आणि सीटीईटीच्या कागदपत्रांवर त्यांचे लग्नापूर्वीचे (माहेरचे) नाव आहे. या अनिवार्य बदलामुळे डिजी लॉकर प्रणाली त्यांची ओळख नाकारत असून, त्यांचे प्रमाणपत्र ब्लॉक झाले आहे. ''हजारो महिला उमेदवारांनी अपार कष्ट करून ही परीक्षा उत्तीर्ण केली आहे. मात्र, केवळ तांत्रिक आणि नावातील तफावतीच्या नियमांमुळे त्यांना हक्काचे प्रमाणपत्र मिळत नाहीये. यामुळे सध्या सुरू असलेल्या विविध शिक्षक भरती प्रक्रियेत त्यांना भाग घेता येत नाही. प्रशासकीय दिरंगाईमुळे या भावी शिक्षकांचे करिअर धोक्यात आले आहे. शेख अब्दुल रहीम (संस्थापक अध्यक्ष, हॅपी टू हेल्प फाउंडेशन तथा राज्य प्रवक्ता महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन)

**या पर्यायी व्यवस्थेची मागणी:**

या समस्येवर तातडीने तोडगा काढण्यासाठी सीबीएसईने आपल्या अधिकृत संकेतस्थळावर (..) एक सुरक्षित आणि समांतर डाऊनलोड यंत्रणा सुरू करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यामध्ये उमेदवारांना त्यांचा रोल नंबर ( ), जन्मतारीख () आणि नोंदणीकृत मोबाईलवर येणारा ओटीपी () या त्रिसूत्रीचा वापर करून थेट प्रमाणपत्र डाऊनलोड करण्याची परवानगी द्यावी, जेणेकरून विद्यार्थ्यांची ससेहोलपट थांबेल.

आता या विद्यार्थी-केंद्रित मागणीवर केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ () काय निर्णय घेते, याकडे हजारो परीक्षार्थींचे डोळे लागले आहेत...

# पत्नीचा छळ झाल्यास विभक्त राहूनही पोटगी मिळण्यास पात्र : मुंबई उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**जालना- प्रतिनिधी**

सासरी पत्नीचा छळ होत असेल किंवा तिला सन्मानाने जगता येईल अशी वाजवी आशा नसेल, तर पत्नी आपल्या पतीसोबत राहण्यास नकार देऊ शकते आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १२५ अंतर्गत पोटगी मागू शकते, असा महत्त्वपूर्ण निकाल मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नुकताच दिला आहे. या निर्णयामुळे पीडित महिलांना मोठा कायदेशीर दिलासा मिळाला असून, कायद्याच्या गैरवापरालाही आळा बसेल, अशी प्रतिक्रिया कायदेतज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे. न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके यांच्या एकलपीठाने पतीची पुनरीक्षण याचिका फेटाळून लावत कौटुंबिक न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला. रेल्वेमध्ये गँगमन म्हणून कार्यरत असलेल्या पतीने दाखल केलेल्या या याचिकेत कौटुंबिक न्यायालयाने पत्नीला सप्टेंबर २०२४ पासून दरमहा ७,००० रुपये पोटगी देण्याच्या दिलेल्या आदेशाला आव्हान दिले होते. यापूर्वी कौटुंबिक न्यायालयाने पतीला १४ जानेवारी २०१७ ते ३१ डिसेंबर २०२० या कालावधीसाठी दरमहा ५०० रुपये आणि त्यानंतर ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत दरमहा ६,००० रुपये पोटगी देण्याचे आदेश दिले होते. पतीने आपल्या याचिकेत असा दावा केला होता की, पत्नीने कोणत्याही पुरेशा कारणाशिवाय स्वतःहून वैवाहिक घर सोडले आहे, त्यामुळे कलम १२५(४) नुसार ती पोटगीसाठी पात्र नाही. उच्च न्यायालयाने आपल्या १० एप्रिलच्या निकालात स्पष्ट केले की, पतीच्या घरात होणारा छळ किंवा गैरवर्तन हे पत्नीसाठी पतीसोबत राहण्यास नकार देण्याचे पुरेसे कारण आहे, जरी यासाठी पती वैयक्तिकरित्या दोषी नसला तरी. जिथे पत्नी सन्मानाने पतीसोबत राहण्याची अपेक्षा करू शकत नाही, तिथे ती त्याच्यासोबत राहण्यास नकार देऊ शकते. पतीने पत्नीला सोबत ठेवण्याचा किंवा तिचा सांभाळ करण्याचा प्रस्ताव प्रामाणिक हेतूने दिलेला असावा, केवळ पोटगीची जबाबदारी टाळण्याच्या उद्देशाने नसावा. पत्नी विनाकारण विभक्त राहत आहे, हे सिद्ध करण्याची जबाबदारी पतीची आहे आणि एकदा ते सिद्ध झाल्यास, विभक्त राहण्यामागे पुरेशी कारणे होती हे सिद्ध करण्याची जबाबदारी पत्नीवर येते.

या निकालावर प्रतिक्रिया देताना, नोटरी असोसिएशनचे जालना जिल्हाध्यक्ष ॲड. महेश धन्नावत यांनी या निर्णयाचे स्वागत केले. ॲड. धन्नावत म्हणाले, ''उच्च न्यायालयाचा हा निकाल महिलांच्या हक्कांना बळकटी देणारा आणि अत्यंत महत्त्वाचा आहे. कलम १२५ चा मूळ उद्देश निराधार आणि गरजू अवलंबितांना भिकारीपणा आणि दुरवस्थेपासून वाचवणे हा आहे. अनेकदा पती केवळ कायदेशीर जबाबदारीतून सुटका मिळवण्यासाठी पत्नीला सोबत राहण्याची तकलादू ऑफर देतो. मात्र, न्यायालयाच्या या निकालामुळे अशा प्रवृत्तींना चाप बसेल आणि खरोखरच पीडित असलेल्या महिलांना न्याय मिळेल.''

न्यायमूर्ती जोशी-फाळके यांनी पुढे नमूद केले की, कलम १२५ चा उद्देश केवळ प्रतिबंधात्मक आहे, तो शिक्षा देणारा नाही. पोटगीच्या आदेशाचा आधार पतीकडून पत्नी, मुले किंवा पालकांचा सांभाळ करण्यास नकार किंवा दुर्लक्ष हा असतो. नकार म्हणजे मागणी करूनही सांभाळ करण्याची जबाबदारी नाकारणे, तर दुर्लक्ष म्हणजे मागणी नसतानाही सांभाळ करण्यात कसूर करणे. हे दुर्लक्ष किंवा नकार केवळ शब्दांतूनच नव्हे, तर वर्तनातूनही सिद्ध होऊ शकतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

ॲड. महेश धन्नावत यांनी पुढे ग्राहकांना, विशेषतः महिलांना आवाहन केले की, ''महिलांनी आपल्या कायदेशीर हक्कांबाबत अत्यंत जागरूक असले पाहिजे. जर सासरी कोणत्याही प्रकारचा शारीरिक किंवा मानसिक छळ होत असेल किंवा सन्मानाने जगणे अशक्य होत असेल, तर त्यांनी कोणताही अन्याय सहन न करता कायद्याचा आधार घ्यावा. विभक्त राहूनही पोटगी मिळवण्याचा हक्क कायद्याने दिला आहे. अशा परिस्थितीत न घाबरता तज्ज्ञ वकिलांचा सल्ला घेऊन कायदेशीर प्रक्रियेला सामोरे जावे. कायदा नेहमीच पीडितांच्या संरक्षणासाठी उभा असतो.''

सदर प्रकरणात, पतीने पत्नीने दाखल केलेल्या घटस्फोटाच्या याचिकेला नोटीस मिळूनही विरोध केला नाही आणि पत्नी आपले जीवन कसे जगत आहे, हे जाणून घेण्याची तसदीही घेतली नाही, हे त्याच्या उलटतपासणीतून स्पष्ट झाले. यावरून पतीने पत्नीकडे दुर्लक्ष केल्याचे आणि तिचा सांभाळ करण्यास नकार दिल्याचे सिद्ध होते. पत्नी आपल्या उदरनिर्वाहासाठी काही कमावत असल्याचे रेकॉर्डवर कोणतेही पुरावे नाहीत. त्यामुळे कौटुंबिक न्यायालयाने दिलेला पोटगीचा आदेश योग्य आणि वाजवी असल्याचे निरीक्षण नोंदवत उच्च न्यायालयाने पतीची याचिका फेटाळून लावली.

# जलसंवर्धनाचा संदेश देत सोमठाण्यात युवा जल दिंडी अभियानाचा शुभारंभ

**जालना - प्रतिनिधी**

माय भारत जालना, यशदा, युनिसेफ आणि पाथ्रीकर कॅम्पस, बदनापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमठाणा येथे युवा जल दिंडी अभियानाचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. जलसंवर्धन, जलसाक्षरता आणि पाणी बचतीबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले हे अभियान दि. १ ते ५ जून २०२६ या कालावधीत बदनापूर तालुक्यातील विविध गावांमध्ये राबविण्यात येणार आहे. सदरील अभियानाचे आयोजन जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते वृक्षसंवर्धनाचा संदेश देत वृक्षाला जलदान करून अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सोमठाणा गावाच्या सरपंच स्वाती नागवे, मयूरकुमार गोरमे जिल्हा युवा अधिकारी माय भारत जालना, सामाजिक कार्यकर्ते संतोष नागवे, उपसरपंच दिलीप मेंढरे,



उपकृषी अधिकारी उमेश भोसले, उपकृषी अधिकारी गोपालदास जुंझारे, कृषी सहाय्यक अधिकारी रुपाली भोसले, जलसंधारण विभागाचे जिल्हा संसाधन व्यक्ती मनोहर सरोदे, प्रा. अमृत तारो तसेच डॉ. रामदास निहाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांचा तुळशीचे रोप भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि जलव्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. पाण्याचे वाढते संकट, भूजल पातळीतील घट आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर युवकांनी जलसंवर्धनासाठी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे वक्त्यांनी नमूद केले. त्यानंतर जल दिंडीची सुरुवात गावातील शहीद सुरेश कदम यांच्या स्मारकाला अभिवादन करून करण्यात आली. जल दिंडीमध्ये सहभागी झालेल्या युवक-युवतींनी आणि विद्यार्थ्यांनी जलसंवर्धनाबाबत विविध घोषणा देत गावातून जनजागृती रॅली काढली. ''पाणी अडवा, पाणी जिरवा'' ''प्रत्येक थेंब अमूल्य आहे'' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. रॅलीदरम्यान ग्रामस्थांना पाणी बचतीचे महत्त्व पटवून देण्यात आले तसेच जलस्रोतांचे संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच या अभियानासाठी सहारा सामाजिक विकास संस्थेचे अध्यक्ष बिस्मिल्ला सय्यद, तेजस जनविकास संस्थेचे अध्यक्ष शिवाजी तायडे तसेच युवा बहुद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष जयपाल राठोड यांचे विशेष सहकार्य लाभले. विविध सामाजिक संस्था, स्वयंसेवक आणि युवकांच्या सहभागामुळे कार्यक्रमाला अधिक प्रभावी स्वरूप प्राप्त झाले. यावेळी डॉ. हटकर, प्रा. मापारी सर, राम शेळके, शीतल वाघ, अर्चना जमदाडे तसेच पाथ्रीकर कॅम्पसचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. युवकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि ग्रामस्थांचा प्रतिसाद यामुळे अभियानाच्या पहिल्याच दिवशी जलसंवर्धनाचा संदेश प्रभावीपणे पोहोचला.

संपूर्ण आठवडाभर चालणाऱ्या या युवा जल दिंडी अभियानामध्ये रॅली, जनजागृती कार्यक्रम, शपथविधी, स्वच्छता उपक्रम, वृक्षारोपण आणि विविध प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून जलसाक्षरतेचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

# भिक्खु संघाची धम्म शांती रॅली!



**दत्ता देशमुख**

समर्थ नगर मधील तक्षशिला बुद्ध विहारांमध्ये दहा दिवसीय श्रामनेर संस्कार शिबिर भारतीय बौद्ध महासभेतर्फे भरविण्यात आले आहे.

त्यानिमित्ताने सकाळी सात वाजता भिकू संघाची भव्य अशी रॅली बुद्धम् शरणम् गच्छामि,धम्मंग शरणं गच्छामि, संघम शरणम गच्छामि, सबका मंगल होय रे अशा शांतीच्या घोषणा देऊन रॅली काढण्यात आली .

यावेळी भिक्खू संघाचे अशोक गंगावणे, तसेच मोरे ताई यांनी फुलांनी स्वागत करून त्यांचे दर्शन घेऊन स्वागत केले. या शिबिरामुळे समर्थ नगरमध्ये धम्ममय वातावरण निर्माण झाले. बुद्धांचा शांतीचा, अहिंसेचा मार्ग अंगीकारणे हेच आजच्या काळाची गरज आहे.

# टेंभुर्णी पोलीस स्टेशन सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी अविनाश राठोड

## कैलास भारती यांची भोकरदन येथे बदली

**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी हे गावं सगळ्यात मोठे गाव मोठी बाजार पेठ आहे. येथील राजकारणाचा तालुक्यावर आणि थेट जिल्हावर अतिसंवेदनशील म्हणून ओळख थेट परिणाम होत असतो.या मुळे येथील ठाणे प्रमुख यांची भूमिका खूप महत्वाची असते.



बदली ही प्रशासकीय बाब असून टेंभूर्णी पोलीस स्टेशन प्रमुख श्री सहाय्यक पोलीस निरीक्षक (सपोनि) कैलास भारती यांची बदली भोकरदन येथे करण्यात आली आहे. त्यांच्या जागी बदनापूर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले सपोनि अविनाश राठोड यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी पदभार स्वीकारला आहे. टेंभूर्णी पोलीस ठाण्याची हद्द ही कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने कायमच चर्चेत राहिली आह. त्यामुळे या पोलीस ठाण्याच्या प्रमुख पदावर *(पान २ वर)*

बदलून गेलेले कैलास भारती आणि टेंभुर्णीकरांचा तसा संवाद कमीच राहिला. त्यांनी कधी शांतता कमिटीची बैठक घेण्याचे कष्ट घेतले नाही. जास्त परिचय केला नाही होऊ दिला नाही.आता पुढे निवडणूक आहे. गावात बऱ्याच समस्या आहे. शिवाजी नगर येथे कधीच कोणतेच वाहन शिस्तीत लागले नाही.गावात मोठ्या प्रमाणात लहान मुले गाडी चालविताना वेग कमी ठेवत नाही.थोडक्यात पोलिस यांचा कमी झालेला धाक निर्माण करण्याचे काम आणि जवाबदारी नवीन आलेले अविनाश राठोड यांच्यावर आलेली असून ते या कडे कसे बघतात हे पाहावे लागेल.

# प्रा.अरुण पडघन यांना मराठी विषयात पी.एचडी पदवी

**जालना - प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड परिक्षेत्रातील भाषा ,साहित्य आणि संस्कृती अभ्यास संकुल स्वा. रा. ती. म.विद्यापीठ ,नांदेड संशोधन केंद्र येथे कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय ,परभणी मराठी विभाग,प्रमुख प्रा.अरुण बळीराम पडघन यांनी सन १९९१ ते २००० च्या दशकातील मराठी आत्मकथनांचा चिकित्सक अभ्यास या विषयावर प्रो.प्राचार्य डॉ.शत्रुघ्न जाधव यांचे मार्गदर्शना खाली आपला पी.एचडी चा शोध प्रबंध सादर केला. दि.२२ मे



२०२६ रोजी पी.एचडी साठी मौखिक चाचणी घेण्यात आली.प्रसंगी डॉ.पृथ्वीराज तौर (संचालक, भाषा साहित्य आणि संस्कृती अभ्यास संकुल स्वा.रा.ती.म.वि,नांदेड ) यांचे अध्यक्षते खाली डॉ.सदाशीव सरकटे (प्राचार्य कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा ) हे रेफरी तर प्रो.प्राचार्य.डॉ.शत्रुघ्न जाधव मार्गदर्शक ,तसेच इंजि.विष्णुजी सोनूने आदी मान्यवरांसह विद्यार्थी यांची उपस्थिती लाभली. या वेळी प्रो. डॉ. डी. एन. मोरे, प्राचार्य डॉ.सुर्यकांत जोगदंड, इंजि. नारायणराव चौधरी ( सदस्य , व्यवस्थापन परिषद स्वारातीम विद्यापीठ, नांदेड.) कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार ,मानव्य विद्या शाखेचे

*(पान २ वर)*

# पत्रकार राहुल मुळे यांना वॉटर पार्कमध्ये अमानुष मारहाण

## बंधक ठेवून कोऱ्या बॉण्डवर सही घेतल्याचा गंभीर आरोप

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील मधुबन कॉलनी येथील रहिवासी व पत्रकार राहुल सुरेश मुळे (वय ३२) यांनी राजूर रोडवरील घाणेवाडी शिवारातील एका वॉटर पार्कमध्ये स्वतःला मारहाण करून बंधक ठेवल्याचा, तसेच कोऱ्या बॉण्डवर जबरदस्तीने सही घेतल्याचा गंभीर आरोप करत पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणामुळे पत्रकार सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २६ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे दोन वाजेच्या सुमारास राहुल मुळे हे राजूर रोडवरील घाणेवाडी शिवार येथे असलेल्या वॉटर पार्कमध्ये पोहण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांनी आपण पत्रकार असल्याचे सांगून प्रवेश शुल्काची पावती न घेता आत जाण्याची विनंती केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तक्रारीनुसार, तेथे उपस्थित असलेल्या भागवत बावणे यांनी त्यांना प्रवेश नाकारला. यानंतर दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला. त्याचवेळी भागवत बावणे यांनी त्यांचे भाऊ विक्रम बावणे तसेच तेथे असलेल्या एका कुल्फी विक्रेत्याला



बोलावून घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे.

राहुल मुळे यांच्या म्हणण्यानुसार, हाच तो पत्रकार आहे जो आपल्याविरुद्ध खोट्या बातम्या लावतो, याला मारा, असे सांगत तिघांनी मिळून त्यांच्यावर लाठी-काठ्यांनी हल्ला केला. या मारहाणीत त्यांच्या उजव्या हाताला, दोन्ही पायांच्या मनगटांना, पाठीवर, मांडीवर तसेच डोळ्याजवळ गंभीर दुखापती झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

यापुढे आरोपींनी त्यांना ओढत एका खोलीत नेले आणि तेथे काही काळ बंधक ठेवून पुन्हा मारहाण केली, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर एका कोऱ्या बॉण्ड पेपरवर जबरदस्तीने सही घेण्यात आली. तसेच ही घटना कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची आणि खंडणीचा गुन्हा दाखल करून अडकविण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारीनुसार, रात्री सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास आरोपींनी त्यांची सुटका केली. त्यानंतर राहुल मुळे हे स्वतःच्या दुचाकीवरून कसाबसा आपल्या मधुबन कॉलनी येथील राहत्या घरी पोहोचले. घरी गेल्यानंतर त्यांनी संपूर्ण घटना पत्नी चित्रा राहुल मुळे यांना सांगितली.

मारहाणीमुळे प्रकृती बिघडल्याने त्यांनी २७ मे रोजी जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार घेतले. त्यानंतर प्रकृती अधिक खालावल्याने २८ मे रोजी मधुबन कॉलनी येथील ओजस हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी राहुल मुळे यांच्या फिर्यादीवरून भागवत बावणे, विक्रम बावणे आणि नाव-पत्ता अज्ञात असलेल्या एका कुल्फी विक्रेत्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३ मधील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी प्रकरणाचा तपास सुरू केला असून घटनेतील सर्व बाबींची चौकशी करण्यात येत आहे.

**पत्रकार संघटनांमध्ये संताप**

पत्रकाराला कथितरीत्या मारहाण, बंधक बनविणे, कोऱ्या बॉण्डवर सही घेणे आणि जीवे मारण्याच्या धमक्या देण्याच्या आरोपांमुळे पत्रकार संघटनांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करून पत्रकारांच्या सुरक्षेची हमी देण्याची मागणी विविध स्तरांतून होत आहे. या संदर्भात लवकरच पोलीस अधिक्षक जालना यांची भेट घेऊन विषयाचे गांभीर्य लक्षात आणुन देऊन दोषींवर कारवाईची मागणी करणार येणार असल्याचे पत्रकारांनी म्हंटले आहे

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.